**नियमीत दिवाणी दावा क्र.१८२/२०१६.**
**(भास्कर व इतर विरुध्द गोरख व इतर)**

## निशाण ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुचा अर्ज **दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९, नियम १ व २** अन्वये तुर्तातूर्त मनाई हुकूमा करीता दाखल केलेला आहे. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एम.व्ही. निंभोरकर आणि प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. जे.सी.मगर यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**वादीचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे -**

२. मौजे जेहूर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथील शेत जमीन गट नं.८४ क्षेत्र ७ हे ५३ गुंठे पोटखराबा १४ गुंठे ज्याच्या चतुर्सिमा खालील प्रमाणेः

| | |
|---|---|
| पुर्वेस - | चिंचखेडा (बु.) गावची शिव, |
| पश्चिमेस - | प्रतिवादी क्र. १ची जमीन गट नं. ८६ व प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यातील जमीन गट नं. ८५. |
| दक्षिणेस - | प्रतिवादी क्र.२ ची जमीन गट नं.१२९, |
| उत्तरेस - | जमीन गट नं. ८३ व गट नं. ८२. |

(सदर मिळकतीस यापुढे **'दावा मिळकत'** असे संबोधिण्यात येईल.)

३. दावा मिळकत वादी क्र.१ ते ७ यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. या पैकी उत्तर-पश्चिम भागाची ४० गुंठे जमीन वादी क्र.८ ला विक्री करण्यात आलेली आहे. गट नं.८४ मधून जवळ जवळ मध्यभागातुन पूर्वे-पश्चिम असा जेहूर चिंचखेडा रस्ता गेला आहे. त्यामुळे या गटाचे उत्तर-दक्षिण असे दोन भाग झाले आहेत. गट नं.८४ च्या पश्चिम बाजुला एक निंब व जांभुळ अशी झाडे आहेत. तर दक्षिण बांधास निंबाचे व जांभळाची झाडे आहेत. सदर झाडे बांधापासून १ मिटर आत मध्ये आहेत. प्रतिवादी क्र.१ हे गट नं.८४ च्या पश्चिम बांधाने आणि प्रतिवादी क्र.२ हे दक्षिण बांध कोरण्याचा प्रयत्न करुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करतात. तसेच झाडांना इजा पोहोंचवण्याचा

प्रयत्न करतात. त्याबाबत वादींनी त्यांना वेळोवेळी विनंती केली. परंतु त्यांनी दुर्लक्ष केले. वादीने तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे दि. ०७.०६.२०१२ रोजी अर्ज देऊन गट नं.८४ ची मोजणी करुन घेतली. सदरची मोजणी दि.१६.०८.२०१२ रोजी प्रतिवादी समक्ष करण्यात आली. त्यामध्ये गट नं.८४ च्या हद्दीत काही झाडे दर्शवण्यात आली आहेत. त्या वेळी प्रतिवादींनी आपल्या मिळकतीची मोजणी करुन घेतो असे वादीस सांगितले. परंतु अदयापपर्यंत मोजणी केलेली नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन दावा मिळकतीच्या पश्चिम आणि दक्षिणेकडील बांध फोडण्याचा प्रयत्न दि.१९.०७.२०१६ रोजी केला व अतिक्रमण करण्याचा दम दिला. त्यामुळे वादीस प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले. या अर्जाव्दारे वादीने दावा मिळकतीवरील आपल्या कब्जा वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये व अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करु नये अशा तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी केलेली आहे.

४. प्रतिवादींनी आपले म्हणणे व कैफियत (नि.१३) दाखल करुन वादीची कथने आव्हानीत केली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी क्र.१ ते ६ हे एकत्र आहेत की विभक्त आहेत, त्यांच्यापैकी कोणी व कधी वादी क्र.८ यांच्या कोणत्या बाजुचे क्षेत्र विक्री केले याचा खुलासा वादींनी केलेला नाही. वादी क्र.१ ते ८ हे प्रत्येकी किती क्षेत्राचे मालक आहेत, याचा खुलासा दाव्यात करण्यात आलेला नाही. तसेच त्यांच्या मालकीचे वेगवेगळे क्षेत्र दर्शवलेले नाही. गट नं.८४ पैकी किती क्षेत्र रस्त्यामध्ये गेले याचा खुलासा वादींनी केलेला नाही. गट नं.८५ या मिळकतीशी प्रतिवादी क्र.१ चा काहीही संबंध नाही. तसेच गट नं.८४ च्या पश्चिमेस गट नं.८५ व गट नं.८६ आहे. गट नं.८६ मध्ये प्रतिवादी क्र.१ व कडु आसाराम रिंढे यांची जमीन दावा मिळकतीला खेटून आहे. तसेच गट नं.१२९ मध्ये प्रतिवादी क्र.१, सर्जेराव म्हस्के आणि शंकर म्हस्के यांची जमीन गट नं.८४ च्या दक्षिणेस खेटुन आहे. सदरची बाब वादीने लपवुन ठेवली असून ते मिळकत धारक याकामी आवश्यक पक्षकार आहेत. दावा मिळकतीमध्ये पूर्वी आंब्याचे झाड होते ते आता तुटले आहे हे प्रतिवादींनी मान्य केले. वादीने कथन केलेली निंब व जांभळ व इतर झाडे सामाईक बांधावर असून त्यावर वादीचे एकटयाचे मालकी हक्क नाहीत. ही झाडे तोडुन विक्री करण्यास प्रतिवादींनी वादीला विरोध केला. त्यामुळे प्रस्तुतचा खोटा दावा व

अर्ज दाखल करण्यात आल्याचे त्यांनी नमुद केले. वादी म्हणतो त्याप्रमाणे त्याच्या मिळकतीमध्ये पश्चिम व दक्षिण बाजुने प्रतिवादींनी कोणतेही अतिक्रमण अथवा बांध कोरलेला नाही. तसेच, झाडांना कोणतेही नुकसान पोहोंचवले नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुत दाव्यास कोणतेही कारण घडले नसल्याने अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

५. वादी आणि प्रतिवादीं यांच्या परस्पर विरोधी कथनांच्या पार्श्वभूमीवर खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्याचे निष्कर्ष कारणामिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी त्यांच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस शाबीत करतात काय? | ... होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादींचे बाजुने आहे काय? | ... होय. |
| ३. | अर्ज नामंजूर झलेस, वादीनचे कधीही न भरुन येण्याजोगे नुकसान होईल काय ? | ... होय. |
| ४. | काय आदेश | .. अंतिम आदेशा प्रमाणे . |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र. १ ते ३ बाबतः-**

६. तुर्तातूर्त मनाई हुकूम हा एक विवेकाधिकार व समन्वयी दाद आहे. वादीस तुर्तातूर्त हुकूम मिळविण्यासाठी तीन मुद्दे म्हणजेच त्याच्या लाभातील सकृतदर्शनी परिस्थिती, सोयीचा समतोल व अर्जाच्या आदेशावरुन होणारे अपरिमीत नुसार या बाबी प्रथमदर्शनी दाखवून देणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे वादीने कोणतीही बाब लपवून न ठेवता न्यायालयासमोर स्पष्ट हकीकत मांडणे जरुरीचे आहे. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी

कथनांवरुन व अभिलेखावरील उपलब्ध्द कागदपत्रांवरुन वादीने प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेसाठी समर्थनीय व परिपोषक पुराव्याच्या आधारे दावा मिळकती मधील त्याचे कायदेशिर हक्क व हितसंबंध सकृतदर्शनी दाखवुन दिले आहे काय, हे प्रथमदर्शनी पहाणे आवश्यक आहे. तसेच, वादीने केलेली तुर्तातूर्त मनाईच्या मागणीला कायद्यातील तरतुदींची बाधा येते किंवा नाही हे देखील सकृतदर्शनी परिस्थिती आधारे पडताळुन पहावे लागेल.

७. वादींनी असे नमुद केले आहे की, दावा मिळकत ही त्यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. त्यामुळे त्या सर्वांनी मिळुन प्रस्तुतचा दावा एकत्रीतरित्या दाखल केलेला आहे. त्याबाबत प्रतिवादींनी असा आक्षेप घेतला आहे की, वादी क्र.१ ते ७ हे एकत्र आहेत की विभक्त, तसेच त्यांच्या कब्जात किती क्षेत्र आहे याचा खुलासा झालेला नाही. तसेच वादी क्र.८ यांना कोणी, कधी व किती क्षेत्र दिले याचा खुलासा करण्यात आलेला नाही. यापूर्वी नमुद केल्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज तुर्तातूर्त मनाई हुकूमासाठी असल्याने वादींनी दावा मिळकतीवरील आपले कायदेशिर हक्क व कब्जे वहिवाट प्रथमदर्शनी पुराव्याव्दारे दाखवुन देणे आवश्यक आहे. त्यानंतरच वादीच्या कब्जे वहिवाटीला प्रतिवादी मार्फत हरकत अडथळा होतो किंवा नाही या बाबत विचार करता येईल. त्या अनुषंगाने वादींनी दाखल केलेले कागदपत्र पाहिले असता, ७/१२ उतारा (नि.४/२) नुसार गट नं.८४ मध्ये वादी क्र.१ ते ७ हे भोगवटादार असल्याचे दिसून येते. तसेच त्यांच्या प्रत्येकाच्या नावापुढे वेगवेगळे क्षेत्र वेगवेगळया फेरफार आधारे लावल्याचे दिसून येते. त्यापैकी भास्कर वेडु पंडीत आणि प्रकाश वेडु पंडीत (वादी क्र.१आणि २) यांच्या कब्जे वहिवाटीत सामाईकरित्या ४२ गुंठे क्षेत्र व १० गुंठे पोटखराबा असल्याचे दिसून येते. वादींनी दाव्यामध्ये दावा मिळकत वडिलोपार्जित असल्याचे नमुद केले असले, तरी आपसातील नाते संबंध स्पष्ट करणारी वंशावळ दिलेली नाही. अथवा, त्याबाबतचा खुलासा दाव्यात नमुद केलेला नाही. ७/१२ उतारा (नि.४/२) नुसार वादी क्र.१ ते ८ यांच्या प्रत्येकाच्या नावे वेगवेगळे क्षेत्र वेगवेगळया फेरफार आधारे लागलेले आहे. ते फेरफार उतारे वादीने अवलोकनासाठी दाव्यासोबत अथवा नंतर दाखत केलेले नाहीत. त्यामुळे या मिळकतीमध्ये वादींना मालकी व कब्जे वहिवाट कशाच्या आधारे मिळाली

त्यांची वहिवाट सामाईक आहे की स्वतंत्र आहे याचा खुलासा होत नाही. याशिवाय या मिळकतीमध्ये वादी क्र.१ ते ८ यांच्या प्रत्येकाच्या हिश्याला वेगवेगळे क्षेत्र नमुद आहे.

८. ज्याअर्थी वादींनी दावा मिळकत वडिलोपार्जित असल्याचे कथन केले आहे त्याअर्थी त्यांचे आपसातील नाते संबंध आणि ही मिळकत त्यांच्याकडे कशी आली याबाबतचा खुलासा होणे आवश्यक होते. तसेच वादी क्र.१ ते ८ हे केवळ जवळचे नातेवाईक आहेत असे दाव्यात कथन असून उपयोगी ठरणार नाही. वादींनी दाव्यासोबत हात नकाशा दाखल केला असून त्यामध्ये गट नं.८४ मध्ये वादी क्र.१ ते ८ यांच्या हिश्याला कोणते क्षेत्र येते हे दर्शविलेले आहे. गट नं.८४ मध्ये ७/१२ पत्रकी वादी क्र. १ ते ८ यांच्या नावे वेगवेगळे क्षेत्र नमुद आहे. गट नं.८४ चा मोजणी नकाशा (नि.४/१) पाहिला असता, त्यामध्ये अशा प्रकारची वेगवेगळी वहिवाट गट नं.८४ मध्ये दर्शविण्यात आलेली नाही. यावरुन असे दिसून येते की, गट नं.८४ मध्ये वादी क्र.१ ते ८ यांच्या प्रत्येकाचे नावे वेगवेगळे क्षेत्र नमुद असले तरी अदयापही ती मिळकत त्या सर्वामध्ये सामाईक आहे. त्या मिळकतीचे वाटप होऊन प्रत्येकाचा हिस्सा विभक्त झालेला नाही. त्यामुळे केवळ ७/१२ पत्रकी प्रत्येकाचे नावे वेगवेगळे क्षेत्र नमुद आहे. याचा अर्थ ती मिळकत विभक्त झाली असा घेता येणार नाही. तसेच महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुतचा दावा गट नं.८४ मध्ये सर्वच्यासर्व कब्जेदारांनी दाखल केला असून कोण्याएकटया कब्जेदाराने इतरांसाठी अथवा स्वतःसाठी दाखल केलेला नाही. त्यामुळे या सर्वाच्या वतीने प्रस्तुतचा दावा प्राथमीक टप्पावर विचारात घेता येऊ शकतो. तसेच वादी क्र.१ ते ८ यांना दावा गट नं.८४ मध्ये मालकी हक्कच प्राप्त होत नाही. अथवा त्या पैकी एकाचा अथवा कोणाचाही दावा मिळकतीवर कब्जाच नाही, असा प्रतिवादींनी अक्षेप घेतला नाही. त्यामुळे ज्याअर्थी वादी क्र.१ ते ८ यांनी गट नं.८४ मध्ये वेगवेगळे कब्जे वहिवाट असतांना हा सामाईकात दावा दाखल केला आहे व आपली कब्जे वहिवाट दर्शविणारा हात नकाशा दाव्यासोबत जोडला आहे. त्याअर्थी दाव्यची प्रथमदर्शनी परिस्थिती विचारात घेत असतांना त्या हात नकाशामध्ये दर्शविलेली कब्जे वहिवाट सर्व वादींना मान्य आहे, असे म्हणता येते.

९.		दावा मिळकत गट नं.८४ मधून पूर्व पश्चिम जेहूर चिंचखेडा रस्ता गेलेला आहे. तो रस्ता पूर्वेकडील चिंचखेडा गांवची शिव या बाजुने गट नं.८४ मधून सुरु होतो आणि पश्चिम दक्षिण कोप-यातील गट नं.८६ मध्ये पुढे जातो. या रस्त्यामुळे गट नं.८४ चे किती क्षेत्र बाधीत झाले याचा खुलासा वादीने या दाव्यात केलेला नाही. परंतु त्यांची आवश्यकता आहे असेही वाटत नाही. कारण गट नं.८४ च्या हद्दीबाबत अथवा एकूण क्षेत्राबाबत प्रतिवादींनी कोणताही अक्षेप घेतलेला नाही किंवा त्याबद्दल वादही नाही. मोजणी नकाशा प्रमाणे गट नं.८४ च्या पश्चिम बाजुस उत्तरेस काही भागात गट नं.८५ असून त्याच्या खाली दक्षिण बाजुस गट नं. ८६ ची हद्द आहे. तर गट नं.८४ च्या दक्षिण बाजुस गट नं.१२९ आहे. गट नं.८४ च्या पश्चिम बाजुकडील बांधावर एक झाड दर्शविण्यात आले असून दक्षिण बांधावर चार झाडे दर्शविण्यात आली आहेत. ही झाडे गट नं.८४ च्या हद्दीपासून काही अंतरावर गट नं.८४ मध्ये आतिल बाजुस दर्शविण्यात आलेली आहेत. त्यामुळे ही झाडे बांधावर आहेत, असे सकृतदर्शणी म्हणता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादींच्या कथनामध्ये तथ्य असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

१०.		प्रतिवादींनी असा अक्षेप घेतला आहे की, गट नं.१२९ मध्ये सर्जेराव म्हस्के आणि शंकर म्हस्के हे कब्जेदार गट नं.८४ ला लागुन आहेत. गट नं.८५ चे मालक वेगळे असून त्या मिळकतीशी प्रतिवादी क्र.१ चा काही संबंध नाही. गट नं.८६ मध्ये प्रतिवादी क्र.१ आणि कडु रिंढे यांची जमीन दावा मिळकतीला खेटुन आहे. त्यामुळे कडु रिंढे, सर्जेराव म्हस्के, शंकर म्हस्के आणि गट नं.८५ चे मालक याकामी आवश्यक पक्षकार आहेत. सदरचा अक्षेप विचारात घेतला असता, प्रस्तुतच्या अर्जावर निर्णय घेत असतांना दाव्याची प्रथमदर्शनी परिस्थिती विचारात घेणे आवश्यक असते. ज्या व्यक्तींनी आपल्या मिळकतीला, कब्जे वहिवाटीला हरकत अडथळा केला आहे. त्या व्यक्ती विरुध्द मनाई हुकूम मागण्याचा अधिकार वादींना आहे. ज्या व्यक्ती विरुध्द काहीच तक्रार नाही अशा व्यक्तींना केवळ ते लगत मिळकतधारक आहेत म्हणून दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक होते. असे प्रथमदर्शनी म्हणता येणार नाही. त्यांना दाव्यामध्ये समाविष्ट न केल्यामुळे दाव्याच्या गुण दोषावर काय परिणाम होतो, याबाबत उभय पक्षांचा पुरावा

दाखल झाल्यानंतर विचार करता येऊ शकतो. त्याबाबत सकृतदर्शनी परिस्थिती आधारे कोणतेही मत नोंदवणे योग्य होणार नाही.

११. आतापर्यंत केलेल्या चर्चे नुसार सकृतदर्शनी परिस्थिती आधारे असे दिसून येते की, दावा मिळकत केवळ वादीची मालकी हक्काने कब्जे वहिवाट आहे. दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुस प्रतिवादी क्र.२ यांची गट नं.१२९ ही मिळकत असून पश्चिम बाजुस प्रतिवादी क्र.१ यांची गट नं.८६ ही मिळकत आहे. मोजणी नकाशा प्रमाणे गट नं.८४ च्या पश्चिम आणि दक्षिण बांधावर काही झाडे असल्याचे दिसून येते. सदरची झाडे बांधावर नसून बांधा पासून काही अंतराव आत मध्ये गट नं.४ मध्ये आहेत. असे असतांना ती झाडे सामाईक बांधावरची असल्याचे कथन प्रतिवादी करत आहेत. अशा परिस्थिती वादीने दाव्यामधील प्रथमदर्शनी परिस्थिती आपल्या बाजुने असल्याचे दाखवुन दिलेले आहे. तसेच, ज्याअर्थी प्रतिवादींनी आपल्या म्हणण्याव्दारे सामाईक बांध आणि त्यावरील झाडे यावर हक्क सांगितला आहे त्याअर्थी दाव्याच्या अंतीम निकालापर्यंत दावा मिळकतीवरील वादीची कब्जे वहिवाट संरक्षीत करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. अशा प्रकारचा मनाई हुकूम न दिल्यास वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये वाद आणि तेढ दिवसेंदिवस वाढत राहिल आणि त्यामुळे वेगवेगळी दावे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय वादीने मागणी केलेला मनाई हुकूम केवळ गट नं.८४ मधील आपली कब्जे वहिवाट संरक्षीत करुन मागितली आहे व त्यामध्ये प्रतिवादीने अतिक्रमण करु नये असा मनाई हुकूम मागितला आहे. अशा प्रकारचा मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल देखील वादींच्या लाभात आहे. या चर्चेअंती वादप्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष वादीच्या लाभात नोंदवन्यात येत आहेत.

**वादप्रश्न क्र. ४ बाबतः-**

१२. यापूर्वी केलेल्या चर्चेनुसार वादी तुर्तातूर्त मनाईचा अनुतोष मिळण्यास पात्र असल्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

अ) अर्ज मंजूर.

ब) दावा मिळकतीवरील वादींच्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादींनी स्वतः अथवा त्रयस्त इसमामार्फत कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये तसेच दावा मिळकतींचा बांध कोरुन वादींच्या जमिनीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत देण्यात येत आहे.

क) खर्च वादीने सोसावा.

स्वाक्षरीत/-

**( भू.र.ठाकूर )**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश(क.स्तर),

दिनांक १८.०४.२०१७. कन्नड.

**-: <u>CERTIFICATE</u> :-**

I affirm that the contents of the P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Prasad P. Joshi |
| Name of Court | Shri. B.R.Thakur |
| Date of Dictation | 18.04.2017 |
| Judgment signed by the P.O. on | 18.04.2017 |
| Judgment uploaded on | 25.04.2017 |